**<u>नियमित दिवाणी दावा क्र. १५८/२०२२ मधील नि.क्र. २७ वरील आदेश</u>**

CNRNOMHSNO70008442022

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १८ नियम १ अन्वये दाखल केला आहे.

०२. वादी यांचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरुध्द दि. ०३.०७.२००३ रोजीचा गहाण दस्त क्र. १०३४/२००३ नुसार झालेल्या गहाणखताची रक्कम पंधरा हजार स्वीकारुन प्रतिवादी यांनी वादी यांना गहाणखत उलटून वादमिळकतीचा ताबा देण्यासाठी केलेला आहे. प्रतिवादी यांनी निशाणी १६ वर आपली कैफियत दाखल केली असून वादीचे पती व प्रतिवादी यांच्यामध्ये गहाणखत झाल्याचे मान्य केले आहे. नि.क्र. २६ अन्वये मुददे निश्चित करुन त्यानुसार मुददा क्र. १ व २ शाबीत करण्याची जबाबदारी प्रतिवादी यांच्यावर देण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये प्रतिवादी यांनी प्रथम पुरावा सुरु करण्याबाबत आदेश पारीत व्हावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी नि.क्र. ३१ वर आपले म्हणणे दाखल करुन असे नमूद केले आहे की, प्रतिवादी यांनी वादीच्या दाव्यातील पूर्ण कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी यांनी वादींविरुध्द इतर तक्रारी देखील केलेल्या आहेत. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी यांनी प्रथम पुरावा देणे आवश्यक आहे. यास्तव अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभीलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन

केले. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

०५. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १८, नियम १ प्रमाणे दाखल केलेला असल्याने सदर तरतुदीचे अवलोकन करणे आवश्यक आहे–

***आदेश १८ नियम १ सुरु करण्याचा अधिकार –*** *''वादीला प्रारंभ करण्याचा अधिकार असेल, मात्र वादीने अभीकथन केलेली तथ्ये प्रतिवादीने मान्य केली आणि वादीने जो अनुतोष मागितला आहे त्याच्या एखादया भागास तो कायदेशिर कायदेविषयक मुददयाचा किंवा प्रतिवादीने अभीकथन केलेल्या ज्यादा तथ्यांचा विचार करता हक्कदार होत नाही असा प्रतिवादींनी दावा केला तर त्याबाबतीत प्रतिवादीला आरंभ करण्याचा अधिकार असेल''.*

०६. वरील तरतुदींनुसार पुराव्याची सुरवात वादीने करण्याची तरतूद आहे. परंतु जर प्रतिवादी यांनी दाव्यातील कथने मान्य केली असतील व कायदेशिर तरतुदीनुसार किंवा प्रतिवादींनी केलेल्या वेगळया कथनांमुळे वादीला अनुतोष मिळण्याचा अधिकार नसेल तर अशावेळी प्रतिवादी यांना आधी पुरावा देण्याचा अधिकार येवू शकतो. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादीचे पती व प्रतिवादी यांच्यामध्ये वाद मिळकतीचे गहाणखत झाले होते व सदर गहाणखतातील रक्कम परत केल्यानंतर वादीला गहाणखत रदद करुन मिळावे व वादमिळकतीचा ताबा मिळावा अशी मागणी वादींनी केलेली आहे. प्रतिवादी यांनी आपल्या कैफियतीमध्ये वादी यांना गहाणखत रदद करुन मागण्याचा अधिकार असल्याचे नाकारले आहे. केवळ वादीचे पती व प्रतिवादी यांच्यामध्ये गहाणखताचा व्यवहार झाला होता ही बाब त्यांनी मान्य केलेली आहे. त्यामुळे दाव्यातील सर्व कथने प्रतिवादीने मान्य केली आहेत असे म्हणता

येणार नाही. यास्तव वरील तरतुदींनुसार प्रतिवादी यांना दाव्यामध्ये सर्वप्रथम पुरावा देण्याचा अधिकार येणार नाही. वादीला तिच्या मागणीप्रमाणे अनुतोष मिळण्यासाठी वादीने आपला पुरावा दाखल करणे आवश्यक आहे. यास्तव दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १८, नियम १ अन्वये वादी यांनी दाव्यामध्ये सर्वप्रथम पुरावा देणे आवश्यक ठरते.

०७. वरील सर्व बाबी विचारात घेता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

KADAM NUTAN SACHIN Digitally signed by KADAM NUTAN SACHIN Date: 2025.06.23 07:22:32 +0530

स्थळ–कवठेमहांकाळ (श्रीमती एन.एस.कदम )

दिनांक २१.०६.२०२५ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

कवठेमहांकाळ

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order is same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date -21.06.2025
Order signed by the
Presiding Officer on -21.06.2025
Order uploaded on -23.06.2025